REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 9 | JUNE - 2024

# ग्रामीण भागातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणामध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

श्री. तोडकरी संतोष दादाराव
संशोधक
बी.ए., एम. ए., डी.एड., डी.एड.
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गणेगाव ता. भूम जि. धाराशिव.

## १.१ प्रस्तावना



विदयार्थ्यांना इंग्रजीचे प्राथमिक ज्ञान माहिती करुन देणे. त्यांना योग्य वाक्यरचना करायला शिकवतात. इंग्रजी भाषेमध्ये गदय, पदय, व्याकरण, रचना असे चार विभाग आहेत. त्यातील व्याकरण हा महत्वाचा भाग आहे. व्याकरणांमुळे भाषेचे सौंदर्य वाढते. तसेच व्याकरणाच्या वापरामुळे विदयार्थ्यांला इंग्रजी बोलताना अडचणी येत नाहीत. व्याकरणाच्या विकासावर भाषेचा विकास अवलंबून आहे. परंतु व्याकरणातील विविध घटक शिकवताना अडचणी येतात. इंग्रजी विषयाच्या व्याकरणातील घटक शिकवत असताना अनेक समस्या येतात.

शाळेत समाजात बोलताना विदयार्थ्यांना अडचणी येऊ नयेत यासाठी शिक्षक सर्वोतोपरी प्रयत्न करत असतो. विदयार्थ्यांना इंग्रजीचे प्राथमिक ज्ञान माहिती करुन देणे. त्यांना योग्य वाक्यरचना करायला शिकवतात. व्याकरणाच्या विकासावर भाषेचा विकास अवलंबून आहे. परंतु व्याकरणातील विविध घटक शिकवताना अडचणी येतात.

इंग्रजी भाषा ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आंतरराष्ट्रीय भाषा समजणे व बोलता येणे, लिहिता येणे अत्यावश्यक आहे. इंग्रजी भाषेमध्ये व्याकरण हा भाग अतिशय महत्त्वाचा आहे. व्याकरणामुळे भाषेतील शब्दाचे अर्थ बदलत असतात. बोलताना व लिहिताना व्याकरण हे हा भाग अतिशय महत्त्वाचा आहे. इंग्रजी भाषेमध्ये देखील बहुतांश भाग हा मराठी व्याकरणासारखा असतो. इयत्ता ६वी च्या अभ्यासक्रमामध्ये (Make the sentences), उपपदे (a, an, the), वाक्यप्रचार (Phrases),, Rehyming Words (यमक जुळविणारे शब्द), Opposite Words (विरुधार्थी शब्द) Translation (भाषांतर करणे), Parts of Speech (शब्दांच्या जाती), Similar Words (समानार्थी शब्द) Tenses (काळ), Numbers (वचन), Types of Sentences (वाक्याचे प्रकार), Gender (लिंग), Saying (म्हणी), Punctuation (विरामचिन्हे) इत्यादी व्याकरण उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमात समाविष्ठ केले आहे. संशोधकास पाचवीच्या वर्गावर अध्यापन करताना जाणविले की विद्यार्थी व्याकरणाचा वापर योग्य प्रकारे करीत नाहीत तसेच व्याकरणामध्ये चुका जास्त प्रमाणात करतात.

विद्यार्थ्यांना जर प्राथमिक स्तरावर इंग्रजी व्याकरण योग्य प्रकारे आकलन झाले नाही तर भविष्यात इंग्रजी विषयाची आवड कमी होईल तसेच माध्यमिक व उच्च शिक्षण घेताना व्याकरण घटक अवघड जाईल योग्य प्रकारे समजला जाणार नाही परिणामी विद्यार्थी इंग्रजी विषयामधील भाषण-संभाषण कौशल्य येणार नाही, योग्यप्रकारे लिहिता येणार नाही वाचलेल्या शब्दांचा योग्य अर्थ समजणार नाही इत्यादी परिणाम होण्याची शक्यता निर्माण होईल म्हणून संशोधकाने सदर संशोधन करणे आवश्यक वाटले.

**संज्ञा :-** ग्रामीण भाग, उच्च प्राथमिक स्तर, इंग्रजी विषयातील व्याकरण, समस्यांचा अभ्यास.

## १.२ संशोधनाची गरज व महत्त्व

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. तसेच इंग्रजी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अवगत आहे. या भाषेचा विकास व्हावा प्रत्येक भारतीय नागरिकाला इंग्रजी भाषा अवगत होण्यासाठी पाया भक्कम असावा लागतो. भाषेचा पाया हा व्याकरण आहे. जेव्हा व्याकरणाचा विकास होईल तेव्हा भाषा परिपूर्ण होईल.

व्याकरण हा तसा पाहिला तर रुक्ष कंटाळवाणा, कठीण वाटणारा विषय आहे. यामध्ये अनेक विभाग पडतात जसे वर्ण प्रकार, अलंकार, स्वर, व्यंजने, संधी, शब्दांच्या जाती, काळ, नाम, प्रयोग, समास, विभक्ती, असे अनेक घटक येतात. यांचा विचारपूर्वक अभ्यास करण्याची गरज आहे. या सर्व घटकांचा अभ्यास करुन जेव्हा लेखन केले जाते तेंव्हाच या वाक्यरचनेला महत्त्व प्राप्त होते.

शासनाने इयत्ता १ ली पासून इंग्रजी हा विषय अभ्यासक्रमात सुरु केला आहे. विदयार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकताना व्याकरण हा घटक त्यांना कठिण वाटतो विदयार्थ्यांना व्याकरणामध्ये कोणकोणत्या घटकात कोणत्या अडचणी येतात याची माहिती घेणे आवश्यक आहे.  इयत्ता ६वी च्या अभ्यासक्रमामध(Make the sentences), उपपदे (a, an, the), वाक्यप्रचार (Phrases),, Rehyming Words (यमक जुळविणारे शब्द), Opposite Words (विरुधार्थी शब्द) Translation (भाषांतर करणे), Parts of Speech (शब्दांच्या जाती), Similar Words (समानार्थी शब्द) Tenses (काळ), Numbers (वचन), Types of Sentences (वाक्याचे प्रकार), Gender (लिंग), Saying (म्हणी), Punctuation (विरामचिन्हे) इत्यादी या व्याकरणातील घटकाबाबत कोणकोणत्या समस्या आहेत हे जाणून त्यावर योग्य उपाययोजना सुचविल्यास वेळी विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरण समजले जाईल व विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची आवड निर्माण होईल.  म्हणून संशोधकाला इंग्रजी व्याकरणात येणाऱ्या समस्या सोडविण्याची गरज वाटली.

इयत्ता ६ वी मधील अभ्यासक्रमातील व्याकरण हे व्याकरणाचा पायाच आहे जर पाया पक्का असेल तर इमारत मजबूत व टिकाऊ होते त्या प्रमाणे प्राथमिक स्तरावरील इंग्रजी व्याकरणाचे चांगल्या प्रकारे आकलन झाले तर विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलणे, लिहिणे, वाचन, भाषण-संभाषण, चांगल्या प्रकारे वाक्य रचना, भाषांतर  अतिशय चांगल्या प्रकारे करु शकतील.

विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर इंग्रजी व्याकरणामध्ये येणाऱ्या समस्यांचे योग्य प्रकारे माहिती करुन घेतल्यास व त्यावर उपाययोजना सुचविल्यास त्याचा फायदा नक्कीच विद्यार्थ्यांना, शिक्षकांना होणार आहे म्हणून सदरचे संशोधन संशोधकाने हाती घेतले आहे.

### संशोधनाचे महत्त्व

इयत्ता ६ वी च्या विदयार्थ्यांना इंग्रजी हा विषय शिकवला जातो. त्यामध्ये व्याकरण हा भाग येतो. विदयार्थ्यांना व्याकरण शिकताना अनेक अडचणी येतात. म्हणूनच त्यांचा व्याकरण हा भाग दृढ झाला पाहिजे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्याकरणातील घटक अभ्यासताना विदयार्थ्यांना अनेक समस्या येतात. विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणाचा योग्य वापर करता न येणे, ते ओळखता न येणे यावर उपाययोजना केल्यास हा घटक विदयार्थ्यांना समजेल. त्यांच्या व्याकरण विकास होईल. विदयार्थ्यांना या संशोधनाचा फायदा होईल या संशोधनामुळे विदयार्थी इंग्रजी विषयावर प्रभुत्व मिळवू शकतील. म्हणून संशोधकाल सदरचे संशोधन महत्वाचे वाटते

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. जास्तीत जास्त कल हा स्पर्धा परीक्षेत भाग घेण्याचा आहे. स्पर्धा परीक्षेत इंग्रजी भाषेचाही वाप केलेला असतो स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षकांना तसेच मुख्याध्यापकांना देखील या संशोधनाचा फायदा होईल. तसेच या संशोधनामुळे शिक्षकांनाही अध्यापन करताना नवी दिशा, दृष्टी मिळेल.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. तसेच इंग्रजी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अवगत आहे. या भाषेचा विकास व्हावा प्रत्येक भारतीय नागरिकाला इंग्रजी भाषा अवगत होण्यासाठी पाया भक्कम असावा लागतो. भाषेचा पाया हा व्याकरण आहे. जेव्हा व्याकरणाचा विकास होईल तेव्हा भाषा परिपूर्ण होईल.

शासनाने इयत्ता १ ली पासून इंग्रजी हा विषय अभ्यासक्रमात सुरु केला आहे. विदयार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकताना व्याकरण हा घटक त्यांना कठिण वाटतो इंग्रजी विषयातील व्याकरण जर विद्यार्थ्यांना चांगले आकलन नाही झाले तर विदयार्थ्यांना इंग्रजी बोलताना, लिहताना, भाषण-संभाषण करताना अनेक अडथळे येतील अशा प्रकारे विदयार्थ्यांचा व्याकरण विकास होणार नाही. प्रत्येक वाक्य हे व्याकरणातुनच तयार होत असते. पायाच भक्कम नसेल तर भाषेचा विकास होणार नाही.

### १.३ समस्या विधान

**ग्रामीण भागातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणामध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.**

### १.४ संशोधनाची व्याप्ती

१) सदर संशोधन हे धाराशिव जिल्हयातील भूम  तालुक्याशी संबंधित आहे.
२) सदर संशोधन ग्रामीण भागातील शाळेशी संबंधित आहे.
३) सदर संशोधन भूम तालुक्यातील पाथरुड बीट अंतर्गत पाथरुड व वालवड केंद्रातील उच्च प्राथमिक शाळेशी संबंधित आहे.
४) सदर संशोधन इंग्रजी विषयातील उच्च प्राथमिक स्तरावरील व्याकरण या विषयाशी संबंधित आहे.
५) सदर संशोधन ग्रामीण भागातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणामध्ये येणाऱ्या अडचणी या विषयाशी संबंधित आहे.
६) सदर संशोधनात उच्च प्राथमिक स्तरावरील व्याकरण व त्यामध्ये येणाऱ्या समसया या विषयी आहे.

### संशोधनाची मर्यादा:-

१) सदर संशोधन हे धाराशिव जिल्हयातील भूम  तालुक्यापुरते मर्यादित आहे.
२) सदर संशोधन ग्रामीण भागातील शाळेपुरतेच मर्यादित आहे.
३) सदर संशोधन भूम  तालुक्यातील पाथरुड बीट अंतर्गत पाथरुड व वालवड केंद्रातील उच्च प्राथमिक स्तरावरील शाळेपुरतेच मर्यादित आहे.
४) सदर संशोधन इंग्रजी विषयातील उच्च प्राथमिक स्तरावरील व्याकरण या विषयाशी पुरतेच मर्यादित आहे. इतर घटकांचा विचार केला जाणार नाही.
५) सदर संशोधन ग्रामीण भागातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणामध्ये येणाऱ्या अडचणी पुरतेच मर्यादित आहे.
६) सदर संशोधन सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापुरते मर्यादित आहे.

### १.५ संशोधन समस्येची गृहीतके

1) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणात समस्या येतात.
2) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणाचे ज्ञान नसल्यामुळे अडचणी येतात.
3) इंग्रजी भाषेमध्ये व्याकरणास महत्त्व आहे.
4) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे व्याकरण चांगले आकलन  झाल्यास विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेबद्दल आवड निर्माण होईल.


### १.६ संशोधनाची उद्दिष्टे

१) उच्च प्राथमिक स्तरावर इंग्रजी विषयामध्ये असणाऱ्या व्याकरणातील घटकांचा अभ्यास करणे.
२) उच्च प्राथमिक स्तरावरील इंग्रजी विषयामध्ये विद्यार्थ्यांना कोणत्या व्याकरणातील घटकामध्ये समस्या आहेत याचा शोध घेणे
३) उच्च प्राथमिक स्तरावरील इंग्रजी विषयातील व्याकरण अध्यापनासाठी कोणकोणती उपाययोजना केली जाते याची माहिती घेणे.
४) विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणामध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

### १.८ संशोधन पध्दती

संशोधनाकरिता आवश्यक असलेली माहिती योग्य प्रमाणात प्राप्त करुन देणाऱ्या विधी म्हणजे संशोधन पध्दती होय.

**संशोधन पध्दतीचे प्रकार**




सर्वेक्षण पध्दतीतील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

### संशोधन पध्दती

संशोधन हे ग्रामीण भागातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील व्याकरणामध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास. या विषयीच्या कारणांचा शोध घेण्यासाठी शिक्षक यांच्याकडून माहिती संकलित करण्यासाठी सदर पध्दती उपयुक्त वाटते त्यामुळे सदर सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

### १.९ संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधक माहिती संकलित करण्यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावली या साधनांचा वापर केला आहे.

### १.१० संशोधनाची जनसंख्या

प्रस्तुत संशोधनासाठी भूम तालुक्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा त्यामधील प्राथमिक स्तरावर अध्यापनाचे कार्य करणारे अध्यापन करणारे सर्व विषय शिक्षक ही जनसंख्या म्हणून गणली आहे.

धाराशिव जिल्हयातील भूम तालुक्यातील पाथरुड बीट अंतर्गत पाथरुड व वालवड या केंद्रातील शाळा निवड ही असंभाव्येत्तर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने केली आहे.

### १.११ सांख्यिकी व ती निवडीची कारणमिमांसा

सदर संशोधनासाठी संशोधक प्रतिसादकांना दिलेल्या प्रश्नावलीचे एकत्रित विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या तंत्राचा वापर करणार आहे. मिळालेला प्रतिसाद हा जर प्रतिसादक १०० असतील तर किती टक्के प्रतिसाद होतो हे शेकडेवारीच्या सहाय्याने मांडले जाणार असून त्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

### प्रश्नावली - शिक्षक

संशोधक समस्येची उकल होण्यासाठी प्रश्नावली या साधनांचा वापर करणार असल्यामुळे मिळालेला प्रतिसाद हा किती प्रमाणात आहे हे समजण्यासाठी शेकडेवारी या तंत्राचा वापर करणार आहे. तसेच आलेखाच्या माध्यमातून सहज प्रश्नातील प्रतिसादाची सहज स्पष्टता लक्षात येण्यासाठी आलेख या तंत्राचा वापर केला आहे.

### १.१२ संशोधन नमुना निवड पध्दती :-

- **तालुक्याची निवड**

धाराशिव जिल्हयामध्ये एकूण ०८ तालुके आहेत. यापैकी भूम तालुक्याची निवड असंभाव्येत्तर आधारित सहेतूक नमुना निवड पध्दतीने केली आहे.

- **प्राथमिक स्तर शाळेची निवड**

धाराशिव जिल्हयातील भूम तालुक्यातील पाथरुड बीट अंतर्गत पाथरुड व वालवड केंद्रा अंतर्गत येणाऱ्या केंद्रातील उच्च प्राथमिक शाळेची नमुना निवड केली आहे.

- **शिक्षकांची निवड**

धाराशिव जिल्हयातील भूम तालुक्यातील पाथरुड बीट अंतर्गत पाथरुड व वालवड केंद्राअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक स्तरावरील शाळेतील २० शिक्षकांची नमुना निवड केली आहे.

## १.१३ निष्कर्ष

### उद्दिष्ट क्र. १ नुसार मिळालेले निष्कर्ष

✓ **उच्च प्राथमिक स्तरावर इंग्रजी विषयामध्ये असणाऱ्या व्याकरणातील घटकांची माहिती घेणे.**

१) प्राथमिक स्तरावर इयत्ता ६ वी वर्गासाठी इंग्रजी विषयातील व्याकरणामध्ये प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६ वी च्या अभ्यासक्रमामध्ये वाक्य तयार करणे (Make the sentences), उपपदे (a, an, the), वाक्यप्रचार (Phrases),, Rehyming Words (यमक जुळविणारे शब्द), Opposite Words (विरुधार्थी शब्द) Translation (भाषांतर करणे), Parts of Speech (शब्दांच्या जाती), Similar Words (समानार्थी शब्द) Tenses (काळ), Numbers (वचन), Types of Sentences (वाक्याचे प्रकार), Gender (लिंग), Saying (म्हणी), Punctuation (विरामचिन्हे) इत्यादी घटक समाविष्ठ करण्यात आले आहेत यास १००% शिक्षकांनी वरील सर्व या प्रमाणे प्रतिसाद दिला आहे. इंग्रजी विषयासाठी इयत्ता ६ वीसाठी एकूण १४ इंग्रजी व्याकरणाचे घटक समाविष्ट आहेत.

२) उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६ वीवर्गासाठी व्याकरणामध्ये उपपदे (a, an, the), Rehyming Words (यमक जुळविणारे शब्द), Opposite Words (विरुधार्थी शब्द) Translation (भाषांतर करणे), Parts of Speech (शब्दांच्या जाती), Gender (लिंग), Numbers (वचन) हे घटक पूर्वज्ञान असणारे आहेत १००% शिक्षकांनी होय प्रतिसाद दिला आहे.

३) उच्च प्राथमिक स्तरावर इयत्ता ६ वी साठी Punctuation (विरामचिन्हे), Tenses (काळ),, वाक्य तयार करणे (Make the sentences), वाक्यप्रचार (Phrases),, Similar Words (समानार्थी शब्द), Types of Sentences (वाक्याचे प्रकार), Saying (म्हणी), सदर नवीन घटक समाविष्ट करण्यात आलेले आहेत यास १००% शिक्षकांनी होय प्रतिसाद दिला आहे. सदर घटक इयत्ता ६ वी साठी समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

### उद्दिष्ट क्र. २ नुसार मिळालेले निष्कर्ष

✓ **उच्च प्राथमिक स्तरावरील इंग्रजी विषयामध्ये विद्यार्थ्यांना कोण-कोणत्या व्याकरणातील घटकामध्ये समस्या आहेत याची माहिती घेणे.**

१) Make Sentences या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना वाक्य समजत नाही वाक्यातील कर्म कसे ओळखावे हे समजत नाही यास सर्वाधिक प्रतिसाद ३५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे., नकारार्थी वाक्य कसे तयार होते हे समजत नाही सर्वांत कमी यास १५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे. विद्यार्थ्यांना Make Sentences या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना वाक्य समजत नाही वाक्यातील कर्म कसे ओळखावे हे समजत नाही यामध्ये सर्वाधिक अडचणी येतात.

२) Articles- a, an, the या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना a या उपपदाचा वापर कधी करावा हे समजत नाही. यास ३५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे., an या उपपदाचा वापर कधी करावा हे समजत नाही.यास ३०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे., the या उपपदाचा वापर कधी करावा हे समजत नाही.हे समजत नाही यास ३५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे.

३) कर्त्याचे लिंग, वचन आणि विभक्ती रुप माहिती नसणे यास ४०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे. विद्यार्थ्यांना कर्त्याचे लिंग, वचन आणि विभक्ती रुप माहिती नसणे यामध्ये सर्वाधिक अडचणी येतात.

४) Rehyming Words (यमक जुळविणारे शब्द) या व्याकरणाच्या घटकामध्ये ध्वनीचा उच्चार समजत नाही यास सर्वाधिक५५% शिक्षकांनी प्रतिसाद दिलेला आहे. इंग्रजी ध्वनीचा उच्चार समजताना विद्यार्थ्यांना अडचणी येतात.

५) Opposite Words (विरुधार्थी शब्द) या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना शब्दसंपत्ती कमी यास ५०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे., तर विद्यार्थ्यांना कोणता विरुध्द अर्थी शब्द लिहावा हे समजत नाही यास ५०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे.

६) Translation (भाषांतर करणे), या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना शब्दसंपत्ती कमी असल्यामुळे अडचणी येतात यास ३५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे., तर योग्य प्रकारे भाषांतर करता येत नाही यास ३५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे. तर वाक्यातील Phrases चा अर्थ समजत नाही यास ३०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे. विद्यार्थ्यांना शब्दसंपत्ती कमी असल्यामुळे, योग्य प्रकारे भाषांतर करता येत नाही वाक्यातील Phrases चा अर्थ समजत नाही या अडचणी विद्यार्थ्यांना Translation (भाषांतर करणे), या व्याकरणाच्या घटकामध्ये येतात.

७) Parts of Speech (शब्दांच्या जाती), या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना शब्दाच्या जात ठरविता येत नाही यास ४५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे., तर नाम व क्रियापद व विशेषण समजत नाही यास ५५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे. विद्यार्थ्यांना शब्दाच्या जात ठरविता येत नाहीम व क्रियापद व विशेषण समजत नाही या अडचणी विद्यार्थ्यांना Parts of Speech (शब्दांच्या जाती), या व्याकरणाच्या घटकामध्ये येतात.

८) साधा भविष्य काळ (Simple Future tense) यामध्ये कर्ता +Shall किंवा Will+क्रियापदाचे रुप समजत नाही व I, We असल्यास Shall व इतरत्र Will चा वापर समजत नाही या दोन्ही क्रिया समजत नाहीत यास सर्वात जास्त ६५% प्रतिसाद आहे. विद्यार्थ्यांना काळ व काळाचे प्रकार समजून घेताना अडचणी येतात.

९) चालू भविष्यकाळ (Future Continuous Tense) यामध्ये कर्ता + Shall, will + be + क्रियापदाचे चौथे रुप यास ५५% होय असा प्रतिसाद दिला आहे I, we, असल्यास shall व इतरत्र Will घ्यावे समजत नाही असा ४५% प्रतिसाद मिळाला आहे.

१०) पूर्ण वर्तमान काळ (Present Perfect Tense) येणाऱ्या अडचणी यामध्ये कर्ता + have किंवा has किंवा + क्रियापदाचे ३ रे रुप ६०% होय असा प्रतिसाद दिला आहे तर We, You, They व ओकवचनी असल्यास have घ्यावे, He, She, it या एकवचनी नाम असल्यास has घ्यावे समजत नाही असा ४०% प्रतिसाद मिळाला आहे.

११) विद्यार्थ्यांना पूर्ण भूतकाळ (Past Perfect Tense) येणाऱ्या अडचणी यामध्ये कर्ता + had + क्रियापदाचे ३ रे रुप समजते यास ६५% होय असा प्रतिसाद दिला आहे तर र्ता + had + क्रियापदाचे ३ रे रुप समजते यास ३५% नाही असा प्रतिसाद दिला आहे असा प्रतिसाद दिला आहे. कर्ता + had + क्रियापदाचे ३ रे रुप समजून घेण्यात अडचणी येतात.

१२) विद्यार्थ्यांना पूर्ण भविष्यकाळ (Future Perfect Tense) येणाऱ्या अडचणी यामध्ये कर्ता + Shall, will + क्रियापदाचे ३ रे रुप विद्यार्थ्यांना समजताना अडचणी असा प्रतिसाद ७०% प्रतिसाद दिला आहे तर I, we, असल्यास shall व इतरत्र Will घ्यावे यास ३०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे. पूर्ण भविष्यकाळ (Future Perfect Tense) येणाऱ्या अडचणी मध्ये कर्ता + Shall, will + क्रियापदाचे ३ रे रुप समजताना विद्यार्थ्यांना अडचणी येतात असा सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला आहे.

१३) पूर्ण भविष्यकाळ (Future Perfect Tense) येणाऱ्या अडचणी यामध्ये कर्ता + Shall, will + क्रियापदाचे ३ रे रुप विद्यार्थ्यांना समजताना अडचणी असा प्रतिसाद ५०% प्रतिसाद दिला आहे तर I, we, असल्यास shall व इतरत्र Will घ्यावे यास ५०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे.

१४) चालू पूर्ण भूतकाळ (Past Perfect Continuous Tense) येणाऱ्या अडचणी मध्ये कर्ता + had + been + क्रियापदाचे ४ थे रुप अडचणी येतात असा प्रतिसाद ६५% शिक्षकांनी दिला आहे तर कर्ता + had + been + क्रियापदाचे ४ थे रुप अडचणी येत नाहीत असा प्रतिसाद ३५% शिक्षकांनी दिला आहे. चालू पूर्ण भूतकाळ (Past Perfect Continuous Tense) येणाऱ्या अडचणी बहुतांश विद्यार्थ्यांना अडचणी येतात.

१५) विद्यार्थ्यांना चालू पूर्ण भविष्यकाळ (Future Perfect Continuous Tense) येणाऱ्या अडचणी मध्ये कर्ता + Shall, will + have + क्रियापदाचे ४ थे रुप अडचणी येतात असा प्रतिसाद ६५% शिक्षकांनी दिला आहे तर कक्रर्ता + Shall, will + have + क्रियापदाचे ४ थे रुपअडचणी येत नाहीत असा प्रतिसाद ३५% शिक्षकांनी दिला आहे. चालू पूर्ण भविष्यकाळ (Future Perfect Continuous Tense) येणाऱ्या अडचणी बहुतांश विद्यार्थ्यांना अडचणी येतात.

१६) Numbers (वचन) या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना s, es, y, ies प्रत्यय लावणे या अडचणी येतात असा प्रतिसाद ४५% शिक्षकांनी दिला आहे तर एकवचन, अनेकवचन समजत नाही असा प्रतिसाद ५५% शिक्षकांनी दिला आहे. Numbers (वचन) या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना एकवचन, अनेकवचन समजत नाही यामध्ये सर्वाधिक अडचणी येतात.

१७) Gender (लिंग) या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना लिंगाचे प्रकार सांगता येत नाहीत या अडचणी येतात असा प्रतिसाद ३५% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे तर पुलिंगी, स्त्रीलिंग व नपसुलिंगी नामाचे वर्गीकरण करता येत नाही असा प्रतिसाद ३०% शिक्षकांनी दिला आहे., सामान्य लिंग लवकर ओळखत येत नाही असा प्रतिसाद ३५% शिक्षकांनी दिला आहे. Gender (लिंग) या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना लिंगाचे प्रकार सांगता येत नाहीत, पुलिंगी, स्त्रीलिंग व नपसुलिंगी नामाचे वर्गीकरण करता येत नाही सामान्य लिंग लवकर ओळखत येत नाही या अडचणी दिसून येतात.

१८) Punctuation (विरामचिन्हे)या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना पूर्णविराम चिन्हांचा वापर करता येत नाही यास प्रतिसाद ३०% शिक्षकांनी प्रतिसाद दिला आहे तर स्वल्प विराम कधी वापरावा हे समजत नाही यास प्रतिसाद ३०% शिक्षकांनी दिला आहे., अवतरण चिन्ह केंव्हा वापरावे हे लक्षात येत नाही असा प्रतिसाद ४०% शिक्षकांनी दिला आहे. Punctuation (विरामचिन्हे)या व्याकरणाच्या घटकामध्ये विद्यार्थ्यांना पूर्णविराम चिन्हांचा वापर करता येत नाही, स्वल्प विराम कधी वापरावा हे समजत नाही, अवतरण चिन्ह केंव्हा वापरावे हे लक्षात येत नाही या अडचणी दिसून येतात.

## ➢ उद्दिष्ट क्र. ३ नुसार मिळालेले निष्कर्ष

✓ **उच्च प्राथमिक स्तरावरील इंग्रजी विषयातील व्याकरण अध्यापनासाठी कोणकोणती उपाययोजना केली जाते याची माहिती घेणे.**

१) विद्यार्थ्यांना व्याकरणातील अडचणी दूर होण्यासाठी घटक निहाय नियोजन केले जाते यास सर्वाधिक ९०% शिक्षकांनी होय प्रतिसाद दिला आहे. विद्यार्थ्यांना व्याकरणामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येक घटक निहाय नियोजन केले जाते.

२) इंग्रजी व्याकरण विद्यार्थ्यांना समजण्यासाठी नवोपक्रम राबविले जातात यास सर्वाधिक ८५% शिक्षकांनी होय प्रतिसाद दिला आहे. इंग्रजी व्याकरण विद्यार्थ्यांना समजण्यासाठी नवोपक्रम राबविले जातात सदर प्रतिसाद योग्य असा आहे.

३) इंग्रजी व्याकरणासाठी प्रत्येक घटकावर आधारित घटक चाचणी घेतली जाते यास १००% शिक्षकांनी होय प्रतिसाद दिला आहे. सर्व शाळांमध्ये इंग्रजी व्याकरणावर आधारित घटकचाचणी घेतली जाते.

## उद्दिष्ट क्र. ४ नुसार मिळालेले निष्कर्ष

✓ **विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणामध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना सूचविणे.**

१) इंग्रजी व्याकरणातील सर्व घटकांचे ज्ञान विद्यार्थ्यांना येण्यासाठी विविध ज्ञानरचनावादी उपक्रमाची निर्मिती करणे आवश्यक आहे.

२) शिक्षकांनी तयार केलेले नवोपक्रम इतर शाळेसाठी उपयोगी होण्यासाठी त्याचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे.

३) कृतियुक्त अध्यापननिती तयार करुन इंग्रजी व्याकरणाचे अध्यापन करणे आवश्यक आहे.

४) मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतील व्याकरण विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्यास लवकर समजते.

५) विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणांबाबत विविध उदाहरणांचा अधिकचा सराव करणे आवश्यक आहे.

६) शैक्षणिक सी.डी. श्राव्य-दृकश्राव्य साधनांचा वापर अध्यापनामध्ये करावा जेणेकरुन विद्यार्थी त्याकडे आकर्षिले जाऊन त्याचा नक्कीच फायदा होईल.

७) विद्यार्थ्यांना इंग्लिश स्पीकिंग कोर्स यासारखे पुस्तकांचा ६० दिवसांचा कोर्स सुट्टीच्या कालावधीत पूर्ण करण्यास सांगावे त्यामुळे इंग्रजी व व्याकरण चांगल्या प्रकारे समजून येईल.

## संदर्भसूची

1) भिताडे.वि. रा., (१९८७), 'शैक्षणिक संशोधन पध्दती', पुणे, नुतन प्रकाशन
2) चौधरी रु. गो, प्रा. अ.आ सांबरे, तृतीय भाषा इंग्रजी विषय व पध्दती , सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.
3) ढाले राम, ढाले शिवराज, (२०११), D.T.Ed English Third language प्रकाशक - विदया पब्लिकेशन, लातूर
4) जोशी व. द., इंग्रजी अध्यापन , राज्य शिक्षणशास्त्र संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे.
5) हासुरे भी. स., हासुरे झटपट इंग्रजी व्याकरण, विदयार्थी सेवा, प्रकाशन पुणे - २
6) Kale B.S., Pragati English Grammarm, Nirali Prakashan,

7) Morey Lata Subhash, (२००८), Methods and Techniques of English Teaching, Pimplapure Prakshan
8) Moharil Medha, (२००७), Methods of English Teaching, Publisher Shri Pramod Murje
9) मराठे एम. जी , जीवन शिक्षण- महाराष्ट्र राज्य शै. सं. प्र. पुणे
10) Pawar N.G., इंग्रजी - विषयज्ञान व अध्यापन पध्दती, नूतन प्रकाशन, पुणे.
11) पवार एन. जी. , तृतीय भाषा इंग्रजी , नुतन प्रकाशन, पुणे.
12) पाटील वा. भा., (२००७) संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.
13) श्री. नवनीत, (२०००), Navneet English Grammar, नवनीत पब्लिकेशन,
14) मुळे रा.श., उमाटे वि.तु., (१९८७), 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे', नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ